RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ६, अंक ८०] मंगळवार, सप्टेंबर ८, २०२०/भाद्र १७, शके १९४२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २०३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृहनिर्माण विभाग**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ सप्टेंबर २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१.**

क्रमांक. एमएमआर-२०२०/प्र.क्र.५६/२०२०/झोपसू.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने,बृहन्मुंबईचा समावेश असणा-या क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१(१९७१ चा महा.२८) याच्या कलम ३अ ची पोट-कलमे (१) व (२) याअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, शासकीय अधिसूचना, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक झोपुयो-१०९५/प्र.क्र.३७/गृहनिर्माण कक्ष, दिनांक १६ डिसेंबर १९९५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची (यात यापुढे ज्याचा “उक्त झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण” असा केला आहे) नियुक्ती केली आहे आणि त्यावर अध्यक्ष, सदस्य व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची देखील नियुक्ती केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी, शासकीय अधिसूचना, गृहनिर्माण विभाग, क्रमांक झोपुधो-१००१ /प्र.क्र.२०७/१४/झोपसु-१, दिनांक ११ सप्टेंबर २०१४ अन्वये उक्त झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे क्षेत्र, त्यामध्ये ठाणे महानगरपालिका क्षेत्राचा समावेश करून वाढविले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास,नवी मुंबई महानगरपालिका (सिडको व नैना यांच्या क्षेत्रांसह) आणि ठाणे, पनवेल, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, मिरा-भाईंदर व उल्हासनगर या महानगरपालिका आणि तसेच अंबरनाथ, बदलापूर, अलिबाग, पेण, खोपोली, माथेरान व कर्जत या नगरपरिषदा यांचा समावेश असणा-या क्षेत्रांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता, त्याचे ठाणे येथे मुख्यालय असणारे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नियुक्त करणे इष्ट आहे असे वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र झोपडपट्टी (सूधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (१९७१ चा महा.२८) याच्या कलम ३अ ची पोट-कलमे (१) व (२) याअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे,—

(अ) उक्त झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या क्षेत्रामधून ठाणे महानगरपालिकेचा समावेश असणारे क्षेत्र वगळीत आहे; आणि

(ब) नवी मुंबई महानगरपालिका (सिडको व नैना यांच्या क्षेत्रांसह) आणि ठाणे, पनवेल, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, मिरा-भाईंदर व उल्हासनगर या महानगरपालिका आणि तसेच अंबरनाथ, बदलापूर, अलिबाग, पेण, खोपोली, माथेरान व कर्जत या

नगरपरिषदा यांचा समावेश असणा-या क्षेत्रांसाठी, त्याचे ठाणे येथे मुख्यालय असणारे, "मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)" म्हणून संबोधण्यात यावयाचे मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नियुक्त करीत आहे, आणि उक्त प्राधिकरणात, पुढीलप्रमाणे,अध्यक्ष, सदस्य व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश असेल :—

| अ. क्र. (१) | पदनाम (२) | पदाचे नाव (३) |
|---|---|---|
| १ | माननीय मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| २ | माननीय मंत्री (गृहनिर्माण) | सदस्य |
| ३ | माननीय मंत्री (नगरविकास) | सदस्य |
| ४ | माननीय राज्यमंत्री (गृहनिर्माण) | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव (गृहनिर्माण) | सदस्य |
| ६ | आयुक्त,नवी मुंबई, ठाणे, पनवेल, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, वसई-विरार, मिरा-भाईंदर व उल्हासनगर महानगरपालिका | सदस्य |
| ७ | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) | सदस्य |
| ८ | उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना) | सदस्य |
| ९ | सर्व संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी | सदस्य |
| १० | सर्व संबंधित नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी. | सदस्य |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एस. व्ही. आर. श्रीनिवास,**

शासनाचे प्रधान सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 8th September, 2020.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA SLUM AREAS (IMPORVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.

No. MMR/2020/C.R. 56/2020/Zopasu.—Whereas, the Government of Maharashtra has, by the Government Notification, Housing and Special Assistance Department, No. Zopuyo-1095/C.R. 37/ Housing Cell, dated the 16th December 1995, appointed the Slum Rehabilitation Authority (hereinafter referred as "the said Slum Rehabilitation Authority", in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3A of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 (Mah. XXVIII of 1971) for implementing the Slum Rehabilitation Scheme for area comprising *Brihan* Mumbai and also appointed the Chairman, Members and Chief Executive Officer thereon;

And whereas, the Government of Maharashtra has, by the Government Notification, Housing Department, No. Zopudho-1001/ C.R. 207/14/ Zopasu-1, dated the 11th September 2014, extended the area of the said Slum Rehabilitation Authority, for implementing the Slum Rehabilitation Scheme, by including therein the area comprising of the Municipal Corporation of Thane;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to appoint the Slum Rehabilitation Authority for implementing the Slum Rehabilitation Schemes for areas comprising of Navi Mumbai Municipal Corporation (including areas of CIDCO and NAINA) and the Municipal Corporations of Thane, Panvel, Kalyan-Dombivali, Bhivandi-Nijampur, Vasai-Virar, Mira-Bhaindar and Ulhasnagar and also Municipal Councils of Ambernath, Badlapur, Alibaug, Pen, Khopoli, Matheran and Karjat, having its headquarter at Thane ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3A of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 (Mah. XXVIII of 1971), the Government of Maharashtra hereby,-

(*a*) excludes the area comprising of the Municipal Corporation of Thane from the area of the said Slum Rehabilitation Authority; and

(*b*) appoints the Mumbai Metropolitan Region Slum Rehabilitation Authority for the area comprising of Navi Mumbai Municipal Corporation (including areas of CIDCO and NAINA) and the Municipal Corporations of Thane, Panvel, Kalyan-Dombivali, Bhivandi-Nijampur, Vasai-Virar, Mira-Bhaindar and Ulhasnagar and also the Municipal Councils of Ambernath, Badlapur, Alibaug, Pen, Khopoli, Matheran and Karjat, to be known as "the Mumbai Metropolitan Region Slum Rehabilitation Authority (excluding the Brihan-Mumbai Municipal Corporation Area)" having its headquarters at Thane, and the said Authority shall consists of Chairman, Members and Chief Executive Officer as follows :—

| Sr.No<br>(1) | Designation<br>(2) | Name of the Post<br>(3) |
|---|---|---|
| 1 | Hon. Chief Minister | Chairman |
| 2 | Hon. Minister (Housing) | Member |
| 3 | Hon Minister (Urban Development) | Member |
| 4 | Hon. State Minister (Housing) | Member |
| 5 | Principal Secretary (Housing Deptt.) | Member |
| 6 | Commissioner- Navi Mumbai, Thane, Panvel, Kalyan-Dombivali, Bhiwandi-Nijampur, Vasai-Virar, Mira-Bhainder And Ulhasnagar, Municipal Corporations. | Member |

| Sr.No (1) | Designation (2) | Name of the Post (3) |
|---|---|---|
| 7 | Managing Director, The City and Industrial Development Corporation of Maharashtra (CIDCO) | Member |
| 8 | Vice President and Managing Director, Navi Mumbai International Airport Influenced Notified Area (NAINA) | Member |
| 9 | Collectors of all respective Districts | Member |
| 10 | Chief Officers of all respective Municipal Council | Member |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. V. R. SRINIVAS,

Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.